राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ साठी राज्यात २० मोबाईल मेडीकल युनिट घेण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१२१८/प्र.क्र.६२२/आरोग्य-७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०१ मार्च, २०१९.

वाचा :-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/MMU/प्रशासकीय मान्यता/८६५७४/२०१८, दि.०३ नोव्हेंबर, २०१८

२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/MMU/प्रशासकीय मान्यता/८५६७५-६७७/२०१८, दि.२६ डिसेंबर, २०१८.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ च्या मंजुर कृती आराखडयामध्ये २० मोबाईल मेडीकल युनिट व पुरक वाहने खरेदीसाठी निविदा प्रक्रिया करण्याकरीता प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ मध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या पीआयपी नुसार २० मोबाईल मेडीकल युनिट मंजूर असून ती यवतमाळ, सिंधुदुर्ग, पालघर, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नांदेड, बुलढाणा, चंद्रपूर, अहमदनगर, रायगड, बीड, अमरावती, अकोला, हिंगोली, जळगांव, धुळे, जालना व ठाणे या ठिकाणी प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. सन २०१८-१९ मध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या पीआयपी नुसार FMR Code २.१.१.१ (Capex) (Amount Approved However, State to operationalize MMUs on Turnkey basis) या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या संदर्भीत प्रस्तावानुसार २० मोबाईल मेडीकल युनिट खरेदीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

FMR Code	Perticular & GOI Remarks	Actual Proposal
PIP 2018-19 Approved FMR Code - 2.1.1.1	(Capex) (Amount Approved However, State to operationalize MMUs on Turnkey basis) Approved Budget Rs.700.00 Lacs.	20 Mobile Medical Units (Dispensary Vehicle & Support Vehicle). The Total Capital Cost Per MMU is Rs.35.00 Lacs on Turnkey basis. Proposed 20 Mobile Medical Units in State of Maharashtra (Yavatmal, Sindhudurg, Palghar, Nashik, Solapur, Aurangabad, Kolhapur, Nanded, Buldhana, Chandrapur, Ahamadnagar, Raigad, Beed, Amaravati, Akola, Hingoli, Jalgaon, Dhule, Jalana, Thane.)

उपरोक्त प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) सदर साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management)

आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्य आरोग्य सोसायटीकडून सन २०१८-१९ साठी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून लेखाशिर्ष FMR Code २.१.१.१. (Capex) (Amount Approved However, State to operationalize MMUs on Turnkey basis) मधून भागविण्यात यावा.
८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.
९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.
१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११०२३१०६८१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH
MADHUKAR
FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.05 11:29:29 +05'30'

(निलेश फाळके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)

५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)